तपासी अंमलदार करिता

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** शेवगांव **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0040 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 04/02/2019 19:07 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 04/02/2019

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 04/02/2019

**Time From (वेळेपासून):** 13:55 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:55 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 04/02/2019 **Time (वेळ):** 14:43 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 022 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 04/02/2019 18:58 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.**(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 15 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** वाघोली ता शेवगाव

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** राहुल पंढरीनाथ नांगरे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**

**(c) Date/Year of Birth (जन्म** 1995 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**



Scanned by CamScanner

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | माळीवाडा दादेगाव रोड शेवगाव ,शेवगांव,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | माळीवाडा दादेगाव रोड शेवगाव ,शेवगांव,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.):

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दिपा भाऊसाहेब राजळे | | | 1. तिसगांव क्रांतीचौक,ता पाथर्डी,शेवगांव, अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | मागीतलेल्या लाचेची रक्कम | 16,500.00 |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | स्वीकारलेल्या लाचेची रक्कम | 16,000.00 |

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 32,500.00

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):

मी राहुल पंढरीनाथ नांगरे वय 24 वर्षे धंदा बांधकाम व्यवसाय रा.माळीवाडा दादेगावरोड ता.शेवगाव जिल्हा अहमदनगर मो.नं. 9175501755समक्ष फिर्याद देतो की,मी वरील तक्त्यावर कुटुंबासह राहण्यास असुन बांधकाम व्यवसाय करतो.मी दि.02/02/2019 अन्टी करप्शन ब्युरो अ.नगर युनिट कार्यालयातील श्री.दिपक दत्तात्रय करांडे पोलीस निरिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो अ.नगर यांचेशी संपर्क करुन त्यांना एका लोकसेविका विरुद्ध लाच मागणीची तक्रार सांगीतली.त्या तक्रारीत मी सांगीतले की,मला शासनाचे कन्ट्रकदार नोंदणी /स्थापत्य सुशीक्षीत बेरोजगार नोंदणी प्रमाणपत्र अ.नगर जिल्हा परीषद अ.नगर यांचेकडुन मिळालेले आहे.त्याचा प्रमाणक क्र.486 असा असुन त्याची मुदत दि. 07/07/2018 ते दि.06/07/2023 अशी आहे.मला तीस लाखापर्यंतची कामाची मर्यादा आहे त्या प्रमाणे मी मौजे वाघोली ता.शेवगाव जिल्हा अहमदनगर येथील सभा मंडपाचे कामासाठी ती निवीदा भरले होती,त्या प्रमाणे मला 1187189/-रु.कामाची निवीदा मंजुर होवुन ग्रामपंचायत कार्यालय वाघोली कडुन दि.14/09/2018 रोजी कामाचा कार्यारंभ आदेश मिळालेला आहे त्याप्रमाणे मी पहिल्या टप्यात सभा मंडपाचे प्लींथ पर्यतचे बांधकाम पुर्ण केले आहे.त्याचे मोजमाप होवुन त्या कामाचे 330532/- रु.चा चेक ग्रामपंचायत वाघोली कडुन मला येणे होता.त्या चेकचे मी ग्रामसेविका वाघोली श्रीमती दिपा राजळे यांची दि.31/01/2019रोजी भेट घेवुन मागणी केली असता त्यांनी मला तो चेक देण्यासाठी चेकच्या मोबदल्यात चेक मधील रकमेच्या 5 टक्के प्रमाणे रकमेची मागणी केली मी त्यांना कशाचे पैसे असे विचारले असता त्यांनी हा रिवाज आहे.यापुढे देखील तुम्हाला वेळोवेळी जेंव्हा चेक निघेल तेंव्हा या प्रमाणे पैसे द्यावे लागतील असे म्हणाल्या.त्यावेळी ग्रामसेविका श्रीमती राजळे या माझ्याकडे कामाच्या चेकच्या मोबदल्यात लाचेची मागणी करीत असल्याचे समजले मी त्यांना माझे कडुन  रक्कम देणे शक्य नाही.असे म्हणालो असता त्यांनी तुम्हाला दोन टक्के तरी रक्कम द्यावीच लागेल असे म्हणाल्या मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसताने ही केवळ माझ्या पेमेंटचा चेक त्यांनी आडवुन ठेवला असल्याने मी त्यांना चेक द्या.चेक क्लीअर झाल्यावर काय ते पाहतो.असे म्हणालो त्यावेळी त्यांनी मला चेक दिला व तो क्लीअर झाल्यावर येवुन भेटण्यास सांगीतले आहे.त्याप्रमाणे दि.02/02/2019 रोजी माझा चेक क्लीअर झाला असुन मी सोमवार दि. 04/02/2019रोजी श्रीमती राजळे ग्रामसेविका वाघोली यांची ग्रामपंचायत वाघोली येथे जावुन भेट घेणार आहे.त्यावेळी आपण त्यांचे विरुद्ध लाचेची कारवाई आयोजीत करण्या बाबत तक्रार सांगीतली.त्यानंतर त्यांनी पो.नि.श्री.करांडे माजी तक्रार ऐकुन मला दि.04/02/2019रोजी माझे कामाचे संबंधीत कागदपत्र,लाचेची रक्कम व मोटारसायकल सह वाघोली गावचे आलीकडे सकाळी 10/00 वा.थांबण्याबाबत सुचना दिली. मी त्यांना दि.04/02/2019रोजी सकाळी 10/00 वा.वाघोली गावचे अलीकडे सुमारे एक किलोमीटर अंतरावर असलेले जी.प.प्रा.शाळेसमोर



Scanned by CamScanner

थांबणार असल्याचे कळविले.त्यानंतर दि.04/02/2019रोजी पो.नि.श्री.करांडे हे पाढऱ्या रंगाची टाटा सुमो सकाळी 10/00 वा.जी.प.प्राथमीक शाळा वाघोली येथे माझ्या जवळ आले व मला जवळ बोलावुन गाडीत बसण्यास सांगीतले.त्यानतंर पो.नि.करांडे यांनी माझी,त्यांचे सहकारी व सोबतचे पंच साक्षीदार यांचेशी ओळख करुन दिली व माझी ओळख त्यांना करुन दिली.त्यानंतर पो.नि.करांडे सो.यांनी दिलेल्या सुचने प्रमाणे पंचांनी मला माझे नाव पत्ता विचारुन तक्रार विचारली असता,मी त्यांना वरील प्रमाणे नाव पत्ता सांगुन माझी वरील प्रमाणे लाच मागणीची तक्रार तोंडी कथन केली.त्यानंतर पो.नि.श्री.करांडे यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझी लाच मागणीची वरील प्रमाण तक्रार माझे स्वहस्ताक्षरात त्यांना लिहुन देवुन त्यावर माझी स्वाक्षरी केली.मी दिलेली लेखी तक्रार दोन्ही पंचांनी व पो.नि.श्री.करांडे यांनी वाचुन पाहुन ती बरोबर असल्याची खात्री करुन त्यावर त्यांनी सह्या केल्या.त्यानंतर मी ग्रामसेवक वाघोली श्रीमती राजळे यांचे विरुद्ध नोंदविलेल्या लाच मागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले.पो.नि.श्री.करांडे यांनी लाच मागणी पडताळणी कारवाईस व्हाईस रेकर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवुन त्याचे वापराबाबत व हाताळणी बाबत माहीती समजावुन सांगीतली.त्यानतंर पो.नि.श्री.करांडे यांनी व्हाईस रेकर्डरमध्ये एक नविन मेमरी कार्ड घालुन व्हाइस रेकर्डर चालु करुन त्या मेमरी कार्ड मध्ये काहीही रेकर्ट नसल्याची माझी व दोन्ही पंचांची खात्री करुन दिली.त्यानतंर पो.नि.करांडे यांनी लाच मागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.01 श्री.मिथुन बोरुडे यांना सुचना समजावुन सांगीतल्या त्यानंतर माझ्या गळ्यात व्हाईस रेकर्डर चालु करुन तो गळ्यात अडकावुन मला पंच नं.01 श्री.बोरुडे यांचे सह ग्रामसेविका श्रीमती राजळे यांची भेट घेण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय वाघोली येथे रवाना केले.त्या प्रमाणे मी पंच नं.01 श्री.बोरुडे यांचेसह ग्रामपंचायत कार्यालय वाघोली येथे जावुन ग्रामसेविका श्रीमती राजळे यांची भेट घेवुन त्यांना चेक शनिवारी क्लीअर झाला असल्याचे सांगीतले त्यावेळी त्यांनी सगळ्याचे मिळुन काय ते करा असे म्हणाल्या त्यावेळी मी त्यांना कीती असे विचारता त्यांनी त्यांचे समोरील कल्क्युलेटरवर हीशोब करुन 16500/- रु.अशी रक्कम मला सांगीतली मी त्यांना एवढे कसे विचारता त्यांनी पाच टक्के प्रमाणे द्यावे लागतील असे म्हणाल्या मी त्यांना वारंवार पाच टक्के रक्कम जास्त होते. कमी करा कामात परवडत नाही.असे म्हणुन रक्कम कमी करणेबाबत वारंवार विनंती केली परंतु त्यांनी पाच टक्के द्यावी लागतील मी सर्वांना विचारणा केली आहे.वाटल्यास फोन लावुन देवु का हाच रिवाज आहे.त्याप्रमाणे मला उत्तरे देवुन माझ्याकडे 16500/- रु.लाचेची मागणी केली. त्यानतंर शेवटी मी त्यांना पुन्हा पैसे कमी करण्याबाबत विनंती क रता त्यांनी त्यास नकार दिला.मी त्यांना सध्या एवढी रक्कम नसल्याची सांगीतली असता त्यांना मी आता कुठे म्हणते बुधवारी मी शेवगावला येणार आहे.त्यावेळेस फोन करते तेंव्हा या असे म्हणाल्या मी त्यांना आता झाले तर येतो नाहीतर बुधवारी येतो असे म्हणुन पंचासह परत पो.नि.श्री.करांडे थांबले त्या ठिकाणी निघुन आलो.त्यानंतर तेथे पो.नि.करांडे यांनी माझ्या गळ्यातील व्हाईस रेकर्डर ताब्यात घेवुन तो बंद केला व मला गाडीत बसण्यास सांगीतले माझ्या सोबत आलेले पंच नं.01 श्री.बोरुडे यांनी माझे सोबत ग्रामसेविका राजळे यांची भेट घेण्यासाठी रवाना केलेपासुन परत येईपर्यंतच्या हकीकती बाबत विचारता त्यांनी मी वरील प्रमाणे सांगीतलेले हकीकती प्रमाणे हकीकत कथन केले.तसेच पो.नि.श्री.करांडे माझेकडे देखील घडलेहकीकती बाबत विचारणा केली त्यानतंर पो.नि. करांडे यांनी दोन्ही पंचासमक्ष व्हाईस रेकर्डमधील ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकुन ते मी व पंच नं.01 यांनी कथन केलेल्या हकीकती प्रमाणे असल्याचे खात्री करुन त्याचा उतारा तयार केला.श्रीमती राजळे यांनी माझ्याकडे स्पष्टपणे लाचेची मागणी केली असल्याने त्याचे विरुद्ध लाचेची सापळा कारवाई ग्रामपंचायत कार्यालय वाघोली येथे आयोजीत करण्याची ठरले.त्यानंतर व्हाईस रेकर्डमध्ये नविन मेमरी कार्ड घालुन त्यात काही एक ध्वनीमुद्रीत नसल्याचे आमची खात्री करुन देवुन मला पंच नं.01 सह श्रीमती राजळे यांची भेट घेण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय वाघोली येथे दुपारी 12/44 वा.रवाना केले.मी पंच नं.01 श्री.बोरुडे यांना माझे मोटार सायकल वर घेवुन ग्रामपंचायत वाघोली येथे जावुन ग्रामसेविका श्रीमती राजळे यांची भेट घेतली व त्यांना आलो होतो मडम,झाले अडजेष्ट असे म्हणालो त्यावेळी श्रीमती राजळे यांनी काय झाल म्हणले तुम्ही असे विचारले मी त्यांना म्हणलं आणलेत काय करु असे विचारता श्रीमती राजळे यांनी द्या इकडे असे म्हणुन माझ्याकडे पैशाची मागणी केली.व उठुन बाजुस असलेल्या मीटींग हलच्या दरवाजात आल्या मी त्यांचे सोबत तेथे गेलो.व माझे उजवे हाताने माझे पन्टचे मागील उजवे खीशात ठेवलेल्या लाचेच्या नोटांची घडी उजव्या हाताने काढुन त्यांचे समोर धरली त्यावेळी श्रीमती राजळे त्यांनी ती लाचेच्या नोटांची घडी उजवे हाताने स्वीकारुन 16500/- आहे ना असे विचारले मी त्यांना 16500/- नाहीत मोजुन घ्या,तुम्हाला किती लागतील तेवढे असे म्हणालो.तेंव्हा श्रीमती राजळे यांनी त्या नोटा दोन्ही हाताने मोजुन 16 आहेत असे म्हणाल्या व त्या नोटांची घडी त्यांचे अंगातील सन कोटचे डावे बाजुचे खालील खीशात ठेवली.व त्यांचे खुर्चीवर येवुन बसल्या मी त्यांना पाचशे सुट चालतय बाकीच्या कामाच असे विचारता श्रीमती राजळे यांनी करते फरमेट तयार करावे लागेल असे म्हणाल्या त्यावेळी मी चालतय असे म्हणुन दरवाजात येवुन लाच स्वीकारल्याचा इशारा केला ती वेळ 13/55 वा.ची होती तो इशारा पाहुन पो.नि.करांडे व सापळा पथक असे माझ्या जवळ आले पो.नि.करांडे यांनी व्हाईस रेकर्डर ताब्यात घेवुन बंद केला त्यानंतर ग्रामसेविका राजळे यांना रंगे हात पकडुन त्यांचे ताब्यातील लाचेची रक्कम हस्तगत करण्यात आली.ग्रामपंचायत वाघोली येथे माझे हात व कपड्याची अंधार खोलीत तपासणी करण्यात आली.तेथील कामकाज आटोपल्या नंतर पो.नि.करांडे व सापळा पथक श्रीमती राजळे यांचेसह शेवगाव पोलीस स्टेशन येथे आले तसेच मलाही शेवगाव पोलीस स्टेशन येथे येण्याची सुचना वरुन मी तेथे हजर झालो.पो.नि.करांडे यांनी पुढील सर्व कायदेशीर कामकाज शेवगाव पोलीस स्टेशन शेवगाव येथे पुर्ण केले असल्याचे कळविले आहे.तरी यातील लोकसेवक श्रीमती दिपा भाऊसाहेब राजळे वय 29 वर्षे धंदा नोकरी ग्रामसेविका,ग्रामपंचायत वाघोली,ता.शेवगाव जिल्हा अहमदनगर वर्ग 3 रा.मु.पो.तिसगांव क्रांतीचौक, ता.पाथर्डी जिल्हा अहमदनगर यांनी मी ग्रामपंचायत वाघोली कडुन वाघोली गावातील सभामंडपाचे बांधकामासाठी निवीदेप्रमाणे घेतलेल्या कामाचे केलेल्या बांधकामाचे मोजमापाप्रमाणे काढलेला 330532/- रु.चेक मला दिल्याच्या मोबदल्यात कायदेशीर परीश्रमीकाखेरीच अन्य पारितोषण अगर बक्षीस म्हणुन त्या चेक मधील नमुद रक्कमेच्या 5टक्के प्रमाणे एकुन 16500/- रुपये लाचेची मागणी आज दि.04/02/2019 रोजी माझेकडे पंच नं.01 श्री.बोरुडे यांचेसमक्ष करुन त्यापैकी 16000/- लाच माझेकडुन पंच नं.1 श्री.बोरुडे यांचे समोर स्वीकारुन स्वताचा सांपत्तीक फायदा मिळवला आहे.म्हणुन माझी श्रीमती दिपा भाऊसाहेब राजळे वय 29 वर्षे धंदा नोकरी ग्रामसेविका ग्रामपंचायत वाघोली ता. शेवगाव जि.अहमदनगर वर्ग 3 यांचे विरुद्ध कायदेशीर फिर्याद आहे.



Scanned by CamScanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Ramraov Tribkraov Dhikle(I (Inspector)) / 1234 or

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे 9213 Rank (पद): पो नि

No.(क्र.): to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
शेवगाव पोलीस स्टेशन

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची

Name (नाम): Ramraov Tribkraov Dhikle
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): 1234



Scanned by CamScanner